Agrowon Dt. 2702/2023

# राज्यात 'जीआय'च्या नोंदणीत डाळिंब पहिले

## हापूस आंबा दुसऱ्या, द्राक्ष तिसऱ्या क्रमांकावर

रत्नागिरी : "भौगोलिक निर्देशांक (जीआय) मिळालेल्या उत्पादनांमध्ये नोंदणी करण्यात डाळिंबाचा राज्यात पहिला क्रमांक आहे. हापूस आंब्याचा दुसरा तर द्राक्ष तिसऱ्या क्रमांकावर आहे. आतापर्यंत कोकणातील १ हजार ६२५ बागायतदार आणि प्रक्रियाधारकांनी हापूस आंब्यासाठी नोंदणी केली आहे," अशी माहिती कोकण



हापूस आंबा उत्पादक विक्रेते सहकारी संस्थेचे सदस्य मुकुंद जोशी यांनी दिली.

पान ४ वर »

### नोंदणीसाठी हे करा...

"नोंदणीसाठी सातबारा उतारा, छायाचित्र आणि आधार, निवडणूक ओळखपत्राची झेरॉक्स अशी कागदपत्रे लागतात. रजिस्ट्रेशनसाठी येणाऱ्या खर्चापोटी २ हजार रुपये शुल्क संस्था घेते. चेन्नईतील कार्यालयात नोंदणी होत असून २५ दिवसांत प्रक्रिया पूर्ण होते. प्रमाणपत्र येण्यासाठी किमान आठ महिन्यांचा कालावधी लागतो. तत्पूर्वी नोंदणीची माहिती व्हाटस्ॲप किंवा दूरध्वनीवरून संस्थेमार्फत दिली जाते," असे जोशी यांनी सांगितले.

राज्यात 'जीआय'च्या नोंदणीत डाळिंब पहिले

» पान १ वरून

रत्नागिरीत आंबा बागायतदारांसाठी आयोजिलेल्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत जोशी यांनी जीआय विषयक माहिती दिली. ते म्हणाले, "हापूस आंब्याला २०१८ साली जीआय मिळाले. देशात जीआय मिळालेली ४२० उत्पादने आहेत. महाराष्ट्रातील ३३ उत्पादनांना जीआय असून त्यात २५ कृषी उत्पादनांचा समावेश आहे. जीआय प्रमाणपत्र देण्यासाठी कोकणातील तीन संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये कोकण हापूस आंबा उत्पादक विक्रेते सहकारी संस्था, केळशी परिसर हापूस उत्पादक संघ आणि देवगड तालुका हापूस उत्पादक संस्थेचा समावेश आहे. आतापर्यंत १ हजार ६२५ आंबा उत्पादक आणि प्रक्रियाधारकांनी जीआय नोंदणी केली आहे. त्यातील कोकण हापूस आंबा उत्पादक संस्थेने ८६६ आंबा बागायतदार आणि १२७ प्रक्रियाधारकांची नोंदणी केली."

"हापूस आंबा मोठ्या प्रमाणात निर्यात केला जात असून दर चांगला मिळावा, यासाठी बागायतदारही 'जीआय'कडे वळत आहेत. त्यामुळे नोंदणीसाठी बागायतदार सकारात्मक होत आहेत. राज्यात डाळिंबाची नोंदणी सर्वाधिक असून त्यापाठोपाठ हापूस आंब्याचा नंबर लागतो. द्राक्षाला जीआय मिळून दहा वर्षांहून अधिक कालावधी झाला आहे. तुलनेत हापूस आंब्याला जीआय मिळून अवघे चार वर्षे पूर्ण झाली आहेत. हापूसला दर अधिक मिळावा आणि मार्केटिंगसाठी जास्तीत जास्त बागायतदारांनी जीआय नोंदणी करावी," असे आवाहन जोशी यांनी केले.

दरम्यान, जीआय टॅगमुळे यापुढे कोकणातील हापूस उत्पादकांचे नुकसान होणार नाही. तसेच ग्राहकांची फसवणूक टाळणे शक्य होईल.

महाअ‍ॅग्रो

Agrowon Dt. 25/02/2023

# तृणधान्यांना करारांतून मिळणार बाजारपेठ

## ‘पणन’कडून तृणधान्य महोत्सवात ११ करार



अ‍ॅग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : तृणधान्य उत्पादक आणि खरेदीदारांना एकत्र आणण्याबरोबरच त्यांनी उत्पादित केलेल्या मालाला हमखास बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी तृणधान्य महोत्सवात ११ सामंजस्य करार करण्यात आले. ‘मिलेट मिशन’मुळे आगामी काळात उत्पादन वाढल्यास तृणधान्यांना हक्काची बाजारपेठ मिळावी,

खरेदीदारांनाही मालविक्रीची हमी मिळावी, यासाठी पणन महासंघाने पुढाकार घेत हे करार केले आहेत.

आंतरराष्ट्रीय तृणधान्य वर्षानिमित्त सध्या महाराष्ट्रात तृणधान्याबाबत मोठ्या प्रमाणात जागृती सुरू आहे. सध्याच्या परिस्थितीत मागणी आणि पुरवठा यात तफावत आहे. तृणधान्यांचे उत्पादन कमी आणि मागणी जास्त तर काही ठिकाणी मागणीनुसार पुरवठा होत नसल्याने दर जास्त अशी परिस्थिती आहे. सावा, कोदो, भगर, कुटकी यांना मागणी आहे. पण त्यांचा पुरवठा पुरेसा होत नाही. ज्वारी, बाजरी आणि नाचणीचा पुरवठा होतो मात्र, नेमका ग्राहक कुठे आहे, हे कळत नाही, असे पणन महासंघाचे निरीक्षण आहे. ही विस्कळित साखळी सुरळीत करण्यासाठी या महोत्सवानिमित्त पणन महासंघाने पुढाकार घेत राज्यातील ११ संस्थांशी सामंजस्य करार केले. यात सहा संस्थांसोबत पणन महासंघाने करार केला आहे. तर ‘महाएफपीसी’सोबत उत्तर प्रदेशच्या एका शेतकरी उत्पादक कंपनीने करार केला आहे. उर्वरित चार शेतकरी उत्पादक कंपन्यांनी खासगी शेतकरी उत्पादक कंपन्यांशी करार केले आहेत.

या करारांच्या माध्यमातून खरेदी-विक्रीची साखळी बळकट होईल, असा विश्वास पणन महासंघाला आहे. तृणधान्याबाबत होणाऱ्या जागृतीमुळे पुढील वर्षी मोठ्या प्रमाणात तृणधान्य उत्पादन वाढेल, असा कृषी विभागाचाही अंदाज आहे.

‘‘तृणधान्य उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर आणि ग्राहकांना माफक दरात उत्पादने देण्यास हे करार उपयुक्त ठरतील. तृणधान्यांचा ग्राहक हा शहरी असल्याने त्यांना पणन महासंघाकडून उत्पादने उपलब्ध करून देणे, तांदूळ आणि गव्हासारख्या धान्यांना पर्याय देणे आदी उद्दिष्टे ठेऊन हे करार झाले. शेतकऱ्यांना योग्य भाव देण्याबरोबरच ग्राहकांना चांगल्या प्रतीची उत्पादने देण्यासाठी हे करार करण्यात आले आहेत,’’ असे पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सुग्रीव धपाटे यांनी सांगितले.

### पणन महासंघाशी करार केलेल्या कंपन्या (कंसात पिके)

- कळसूबाई मिलेट फार्मर्स प्रो. को. लि., नगर (बर्टी, राळा, वरई)
- मेळघाट फार्मर प्रोड्युसर कंपनी, चिखलदरा (कुटकी, सावा, कोदो, ज्वारी)
- शिवाई फार्मर्स प्रोड्युसार कंपनी (नाचणी)
- गुहागर ऑरगॅनिक प्रोड्युसर कंपनी (नाचणी)
- भुदरगड नॅचरल फार्मर प्रोड्युसर कंपनी (नाचणी, ज्वारी, बाजरी, वरई)
- लोक संचलित साधना केंद्र, खेड, रत्नागिरी (नाचणी)

### गुड टू ईट समृद्धी अ‍ॅग्रो ग्रुप, राहुरीचे करार

- कळसूबाई ट्रायबल फार्मर्स प्रोड्युसर कंपनी (सावा, राळा, ज्वारी, नाचणी)
- टेंडर ग्रे एलएलपी, नाशिक (ज्वारी, बाजरी, नाचणी)
- मिस्टी एफपीसी, जळगाव (ज्वारी)
- मेळघाट एफपीसी (कोदो, सावा, राळा)

### उत्तर प्रदेशातील कंपनीशी करार

- महाएफपीसीशी उत्तर प्रदेश येथील रामपूर कृषक फार्मर कंपनी

> **पणन महासंघातर्फे खुल्या बाजारापेक्षा चांगल्या दरात शेतीमाल विकत घेतला जाईल. त्यामुळे खात्रीशीर खरेदीदार तयार झाला की आपोआप उत्पादनही वाढेल. सध्या ग्राहकांची ऑनलाइन खरेदीतून होणारी फसवणूक थांबविण्याचा आमचा मानस आहे.**
> – **डॉ. सुग्रीव धपाटे**, व्यवस्थापकीय संचालक, पणन महासंघ.

महाॲग्रो

Agrowon Dt. 23/02/2023

# तृणधान्यांचा प्रसार झाल्यास शेतकऱ्यांना चांगला दर : दिवेकर

ॲग्रोवन वृत्तसेवा

मुंबई : ''तृणधान्याला गरिबांचे धान्य म्हटल्याने याआधी या धान्यांचा प्रसार झाला नाही. मात्र, आंतरराष्ट्रीय तृणधान्य महोत्सवामुळे शेतकऱ्याला चांगला भाव आणि ग्राहकांना माफक दर हे उद्दिष्ट साध्य होईल,'' असा विश्वास आहारतज्ज्ञ ऋतुजा दिवेकर यांनी बुधवारी (ता.२२) व्यक्त केला.

पणन विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित तृणधान्य महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. खासदार सुप्रिया सुळे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले.

दिवेकर म्हणाल्या, ''तृणधान्यांचा वापर दैनंदिन आहारात झाला तर त्यातील पौष्टिक तत्वांमुळे आपल्याबरोबर आपल्या पुढील पिढ्याही सुदृढ होतील. त्यांचे आरोग्य चांगले राहील. आपल्या खाद्यसंस्कृतीचे महत्त्व लोकसाहित्यातून पुढच्या पिढीपर्यंत आले. मात्र, आपण ते विसरत गेलो आहोत. एखादी गोष्ट जोपर्यंत पूर्णपणे नष्ट होत नाही तोपर्यंत त्याचे महत्त्व आपल्याला कळत नाही. भगर, ज्वारी, नाचणी अशी तृणधान्य त्यांच्या नावाने ओळखली जावीत. ती मुख्य प्रवाहात आली तर शेतकऱ्यांना चांगला भाव मिळेल. तेव्हाच या मिशनचा फायदा होईल.''



मुंबई पणन विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित तृणधान्य महोत्सवाचे उद्घाटन करताना अनुप कुमार, आहारतज्ज्ञ ऋजुता दिवेकर आदी.

## 'तृणधान्यांना अन्नाचा पर्याय बनविणे गरजेचे'

''तृणधान्यांना भविष्यासाठी अन्नाचा पर्याय बनविणे ही काळाची गरज आहे. या पिकांच्या आरोग्य विषयक फायद्यांबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे,'' असे सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार यांनी सांगितले.

कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले म्हणाले, ''तृणधान्याचे कमी होणारे क्षेत्र ही चिंतेची बाब आहे. बाजारपेठेत योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी तृणधान्याच्या उत्पादनाकडे वळत नाही. शेतकरी नगदी आणि अधिक भाव मिळणाऱ्या पिकाचे उत्पादन घेत आहेत. ज्वारीची उत्पादकता वाढली असली तरी त्याचे उत्पादन मात्र सातत्याने घटत आहे. या पिकांना चांगला भाव मिळाला तरच शेतकरी त्याकडे वळतील. तृणधान्यांना चांगल्या दर मिळावा यासाठी आपल्याला फूड प्रोसेसिंगकडे वळावे लागेल. 'रेडी टू इट' आणि फास्ट फूडच्या समांतर पदार्थ तयार करणारी यंत्रणा आपल्याला विकसित करावी लागेल.''

पणन महासंघाने 'जागर' हा ब्रँड तयार केला आहे. यावेळी ब्रँडचे अनावरण झाले. या ब्रँडच्या ॲम्बेसिडर होण्याची विनंती अनुपकुमार यांनी ऋतुजा दिवेकर यांना केली. दिवेकर यांनी ती विनंती स्वीकारली.

लोकमत

हायलँड्स फार्मर्स प्रोड्युसर कंपनीच्या व्यावसायिक निर्यातीला यश

# पुरंदरच्या अंजिरांची साडेपाच क्विंटलची पहिली खेप पोहोचली हाँगकाँगला

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुंरदरच्या अंजिरांची पहिली व्यावसायिक निर्यातील पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्युसर कंपनीला यश आले असून, साडेपाच क्विंटलची पहिली खेप हाँगकाँगला पाठविण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या प्रायोगिक तत्त्वावरील निर्यातीमुळे शेतकऱ्यांच्या आशा उंचावल्या आहेत.

> पुरंदरचे अंजीर नेहमीच अत्यंत नाशवंत मानले जायचे, त्यामुळे दूरच्या बाजारपेठेत त्याची निर्यात करता येत नव्हती. मात्र, कंपनीची टीम तसेच भागीदारांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे आता पुरंदरचे ताजे अंजीर जागतिक बाजारपेठेत व्यावसायिकदृष्ट्या पाठविण्यात आले आहेत. आता शेतकऱ्यांनी निर्यातक्षम उत्पादनाकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे.
>
> - **रोहन उरसळ, अध्यक्ष** व व्यवस्थापकीय संचालक, पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्युसर कंपनी.



शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या पुरंदर हायलँड्स फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड गेल्या वर्षी जर्मनीतील हॅम्बर्ग तसेच काही युरोप आणि दक्षिण आशियाई देशांमध्ये प्रायोगिक तत्त्वावरील नमुना खेप निर्यात केल्यानंतर जवळपास एक वर्षानंतर पुरंदरच्या अंजिरांसाठी व्यावसायिक निर्यातीची पहिली ऑर्डर मिळाली. ही निर्यात १० फेब्रुवारी रोजी केली. तर रविवारी (दि. १९) आयात करणाऱ्या ग्राहकाकडून सकारात्मक अभिप्राय मिळाला. त्यामुळे ही निर्यात यशस्वी झाल्याची माहिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक रोहन उरसळ यांनी सांगितले.

आयात करणाऱ्या एजंटकडून आणखी पाच ते सात ऑर्डर मिळाल्या आहेत. हाँगकाँग, मलेशिया, सिंगापूर व कंबोडिया या देशांमध्ये ही निर्यात केली जाणार आहे. पुढील १५ एप्रिलपर्यंत साधारण दर आठवड्याला ही निर्यात केली जाईल. प्रत्येक ऑर्डरमध्ये सुमारे ४ ते ६ क्विंटल अंजीर पाठविण्यात येणार आहेत. पहिल्या ऑर्डरमध्ये चार शेतकऱ्यांचा साडेपाच क्विंटल माल होता. आता पुढील निर्यातीसाठी सुमारे २० ते २२ शेतकऱ्यांच्या निर्यातक्षम बागांचा समावेश आहे, असेही ते म्हणाले. या निर्यातीत संचालक समील इंगळे, गणेश कोलते, सागर लवांडे, अमन इंगळे, अतुल कडलग, सागर धुमाळ, रूपाली कडलग, संपत खेडेकर, रामचंद्र खेडेकर, गणेश जाधव, दीपक जगताप यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच माजी पणन संचालक सुनील पवार यांनी या निर्यातीला मार्गदर्शन केले.



पुरंदरचे अंजीर नाशवंत मानले जायचे, दूरच्या बाजारपेठेत त्याची निर्यात करता येत नव्हती. मात्र, आता नव्या पॅकिंगमुळे अंजीराची दूरवर वाहतूक शक्य होत आहे.

# पौष्टिक तृणधान्य विक्रीसाठी 'जागर' ब्रॅण्ड

## 'सहकार, पणन'चे अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार : मुंबई येथे २२ फेब्रुवारीपासून तृणधान्य महोत्सव



**आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त राज्य पणन विभाग आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या वतीने तृणधान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नरिमन पॉइंट येथील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे २२ ते २४ फेब्रुवारीदरम्यान हा महोत्सव होईल. यात उत्पादक शेतकरी आणि प्रक्रिया उद्योग कंपन्यांनाही निमंत्रित केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन होईल. या पार्श्वभूमीवर सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार यांच्याशी संवाद साधला. '''जागर मार्केटिंग फेडरेशन'च्या ब्रॅण्डमधून तृणधान्यविषय जागृती महाराष्ट्रभर पोहोचेल,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.**

**बाळासाहेब पाटील** : अॅग्रोवन वृत्तसेवा

**प्रश्न : आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त आपल्याला महाराष्ट्रातून काय अपेक्षित आहे?**

**उत्तर** : महाराष्ट्र हे प्रमुख तृणधान्य उत्पादक राज्य आहे. केवळ बाजरी नव्हे तर, ज्वारी, नाचणी, रागी यांसारखी पिकेही मोठ्या प्रमाणात येथे घेतली जात होती. या पिकांचे केवळ उत्पादनच नव्हे, तर ही धान्ये रोजच्या आहारात होती. मात्र, जेव्हा हरितक्रांती झाली, त्यानंतर गहू आणि मोहरी मोठ्या प्रमाणात आपल्या आहारात आले. अत्यंत आरोग्यदायी आणि पौष्टिक धान्ये आपल्या खाद्यसाखळीतून नाहीशी झाली. त्याचा परिणाम असा झाला की ही पिके शेतातूनही कमी झाली. रोख उत्पन्न देणाऱ्या पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात होऊ लागली. त्याचाही परिणाम तृणधान्याच्या लागवडीवर झाला. त्यामुळेच महाराष्ट्रातील



तृणधान्य लागवडीचे क्षेत्र वाढविणे, उत्पादित मालाला बाजारपेठ मिळवून देणे आणि ग्राहकांना वाजवी दरात ही उत्पादने मिळवून देणे हा आमचा उद्देश आहे.

**प्रश्न : सरकारी पातळीवर कोणत्या विभागांचा समावेश आहे आणि पणन विभाग यात काय भूमिका बजावत आहे?**

**उत्तर** : निरोगी जीवनशैलीसाठी आवश्यक धान्य कमी होत चालल्याने २०१८ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशपातळीवर तृणधान्य वर्ष साजरे केले. त्यानंतर संयुक्त राष्ट्रसभेत आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरे करण्याबाबत प्रस्ताव दिला होता. त्याला ७२ देशांनी पाठिंबा दिला. आता हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे केले जात आहे. यात पणन, कृषी, महिला व बालविकास, ग्रामविकास आदी विभाग हे वर्ष साजरे करत आहेत. उत्पादकांना चांगली किंमत मिळत नाही. ग्राहकांना तृणधान्यांची उत्पादने महाग मिळतात. उत्पादक ते ग्राहक या साखळीत मोठा विस्कळीतपणा आहे. ही साखळी ना शेतकऱ्याच्या फायद्याची, ना ग्राहकाच्या सोयीची. त्यामुळे ही उत्पादने मध्यवर्गीय ग्राहकांना परवडेल, अशा दरात उपलब्ध होतील, ही गरज ओळखून 'मार्केटिंग प्लॅन' तयार केला आहे. तृणधान्यांपासून तयार केलेल्या पदार्थांची विक्री तीन दिवस केली जाईल.

**प्रश्न : तृणधान्य उत्पादक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी सरकार काय करेल?**

**उत्तर** : या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही बाजार समित्यांना सूचना केल्या आहेत. ज्या बाजार समित्यांमध्ये आवक आहे, तेथे वाजवी दरात ही धान्ये उपलब्ध करून द्यावीत, अशा सूचना केल्या आहेत. मार्केटिंग फेडरेशन आपला स्वतःचा जागर नावाचा ब्रँड तयार करत आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या, बचत गट, सहकारी संस्थांशी फेडरेशन संपर्क करत आहे. शहापूर, वाडा, विक्रमगड, मेळघाट, चिखलदरा, नंदूरबार जिल्ह्यांतील काही क्षेत्र, कोल्हापूर जिल्ह्यातील नाचणीचे क्षेत्र, लातूर, उस्मानाबाद, जालना ही क्लस्टर निश्चित केली आहेत. केवळ ज्वारी आणि बाजरीसाठी काम करत नसून जी आरोग्यासाठी खूप जास्त उपयोगी आहेत, अशी तृणधान्य आम्ही केंद्रस्थानी आणणार आहोत.

**प्रश्न : या महोत्सवाचे स्वरूप कसे असेल?**

**उत्तर** : महोत्सवात प्रदर्शन आणि विक्रीबरोबर मार्केटिंग फेडरेशन काही कंपन्यांसोबत करारही करेल. मी स्वतः सादरीकरण करणार आहे. तसेच आहारतज्ज्ञ ऋतुजा दिवेकर मार्गदर्शन करतील. 'मिलेट मॅन' खादर वली हे मार्गदर्शन करतील. मध्यमवर्गीय लोकांत यांची मागणी वाढावी, यासाठी हा महोत्सव मार्गदर्शन करेल. उत्पादकांना योग्य भाव देणे, माहिती प्रसार करणे, उत्पादक कंपन्यांचा शेतकऱ्यांशी जोडणे आणि उत्कृष्ट पदार्थ निर्मितीसाठी साहाय्य करणे, सार्वजनिक संस्थांद्वारे मार्केटिंग करून माफक किमतीत उत्पादने उपलब्ध करून देणे ही आमची उद्दिष्टे आहेत. ही उद्दिष्टे या महोत्सवातून साध्य होतील, असा विश्वास वाटतो.

# नाशिकमधून युरोपीयन देशांत २४ हजार मेट्रिक टन द्राक्षांची निर्यात!

## ▮ नेदरलँडला सर्वाधिक; देशाला मिळाले कोट्यवधींचे परकीय चलन

▮ अतुल भांबेरे



नाशिक : गेली दोन वर्षे द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांसाठी अत्यंत कठीण गेली. मात्र, यंदा नववर्षाची सुरुवातच द्राक्ष निर्यातीसाठी चांगली झाली असून, गेल्या दीड महिन्यात महाराष्ट्रातून युरोपीयन देशांमध्ये २००२ कंटेनर्समधून २६ हजार ४११ मेट्रिक टन द्राक्षांची निर्यात झाली आहे. यात सर्वाधिक २४ हजार ९२७ मेट्रिक टन द्राक्षे एकट्या नाशिक जिल्ह्यातून गेली आहेत. यातून कोट्यवधींचे परकीय चलन भारताला मिळाले आहे.

देशामध्ये द्राक्ष उत्पादनात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक असून, नाशिकची ओळख तर द्राक्षपंढरी म्हणून आहे. नाशिक जिल्ह्यात ६२ हजार ९८२ हेक्टर क्षेत्रावर द्राक्षांची लागवड केली जाते. त्यात निफाड, दिंडोरी आणि नाशिक हे तालुके द्राक्ष उत्पादनात अग्रेसर आहेत. विशेष म्हणजे, राज्यातील ९१ टक्के द्राक्ष निर्यात नाशिक जिल्ह्यातून होत असून, यंदा तर नववर्षाच्या पहिल्या दहा दिवसांत एकट्या युरोप खंडात नाशिक जिल्ह्यातून १९७ मेट्रिक टन द्राक्षे रवाना झाली होती. त्यानंतर आता जवळपास एका महिन्यात नाशिक जिल्ह्यातून ९५७६.१५० मेट्रिक टन द्राक्षांची युरोप खंडात निर्यात झाली आहे. तर आतापर्यंत २४ हजार ९२७ मे. टन द्राक्ष निर्यात झाली आहे. त्यात नेदरलँड या देशामध्ये सर्वाधिक २० हजार ३३१ मे. टन (१५४३ कंटेनर्स) तर सर्वांत कमी १३ मे. टन द्राक्षे ऑस्ट्रिया या देशात निर्यात झाली आहेत.

युरोप खंडातील नेदरलँड, जर्मनी, बेल्जियम, यूके आणि डेन्मार्क हे द्राक्षांची आयात करणारे मुख्य देश आहेत. युरोपवगळता इतर खंडांचा विचार केला तर रशिया, यूएई, कॅनडा, तुर्की आणि चीन या देशांतून द्राक्षांना मोठी मागणी असून, येथेही मोठ्या प्रमाणावर द्राक्षांची निर्यात झाली आहे. १५ फेब्रुवारीनंतर निर्यातीचा खरा काळ सुरू झाला असून, द्राक्षाला योग्य दर मिळावा, यात घसरण होऊ नये, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

**जिल्हानिहाय युरोपीयन देशात निर्यात झालेली द्राक्ष**

| जिल्हा | द्राक्ष निर्यात (मे.टन) |
|---|---|
| नाशिक | २४,९२७ |
| सांगली | ९१० |
| सातारा | ३४७ |
| अहमदनगर | १३१ |
| पुणे | ४९ |
| लातूर | २४ |
| उस्मानाबाद | १५ |

❝ यंदा द्राक्षांची निश्चितच चांगली निर्यात होईल, शेतकऱ्यांनी देखील निर्यातक्षम चांगली द्राक्षे घेतली आहेत. सव्वा लाख मे. टनाहून अधिक निर्यात होईल, असा अंदाज आहे. मागील दोन वर्षे आधी कोरोना आणि त्यानंतर रशिया-युक्रेन युद्धाचा मोठा फटका द्राक्ष निर्यातीला बसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. मात्र, यंदा वर्षाची सुरुवात चांगली झाल्याने शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

– **कैलास शिरसाठ,**
कृषी विभाग उपसंचालक

Punyanagari Dt. 21/02/2023

# देशात सहकार तळागाळापर्यंत नेण्यासाठी केंद्राची योजना

## मंत्रिमंडळाची मान्यता ; सहकार चळवळ बळकटीचे प्रयत्न

**नवी दिल्ली :** देशातील सहकार चळवळीला बळकटी देऊन ती तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठीच्या योजनेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली आणि गृह आणि सहकारमंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार मंत्रालयाने योजना तयार केली आहे. याअंतर्गत मत्स्य व्यवसाय, पशुसंवर्धन व दुग्धविकास मंत्रालयाच्या विविध योजनांच्या एकत्रीकरणाच्या माध्यमातून 'संपूर्ण-सरकार' दृष्टिकोनाचा लाभ घेत, प्राथमिक कृषी पतसंस्था नसलेल्या प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये प्राथमिक कृषी पतसंस्था, दुग्ध सहकारी संस्था नसलेल्या गावात व्यवहार्य दुग्ध सहकारी संस्था तसेच समुद्रकिनाऱ्यांलगतच्या गावात मत्स्यपालन संस्था स्थापन करण्यासाठी, तसेच मोठे जलस्रोतांच्या गावात आणि प्राथमिक कृषी पतसंस्था, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी योजना तयार केली आहे. सुरुवातीला, पाच वर्षांत २ लाख कृषी पतसंस्था, दुग्ध व्यवसाय, मत्स्यपालन सहकारी संस्था स्थापन केल्या जातील. यासाठी नाबार्ड, राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ (एनडीडीबी) आणि राष्ट्रीय मत्स्य विकास मंडळाच्या (एनएफडीबी) माध्यमातून कृती आराखडा केला जाईल.

### योजनांचे एकत्रीकरण..

**पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभाग**

- डेअरी विकासासाठी राष्ट्रीय कार्यक्रम (एनपीडीडी)
- डेअरी प्रक्रिया आणि पायाभूत सुविधा विकास निधी (डीआयडीएफ)

**मत्स्य व्यवसाय विभाग**

- पंतप्रधान मत्स्य संपदा योजना (पीएमएमएसवाय)
- मत्स्य व्यवसाय व मत्स्यपालन पायाभूत सुविधा विकास (एफआयडीएफ)

### शेतकऱ्यांसाठी सहकारी संस्था

देशभरातील शेतकरी सभासदांना त्यांच्या उत्पादनाची विक्री करण्यासाठी, उत्पन्न वाढीसाठी, कर्ज सुविधा, गावपातळीवरच इतर सेवा मिळण्यासाठी आवश्यक सुधारणा आणि मागासांसाठी सुविधा प्राप्त होतील. ज्या प्राथमिक सहकारी संस्थांचे पुनरुज्जीवन होऊ शकत नाही, त्या बंद करण्यासाठी अशा संस्था निश्चित केल्या जातील आणि त्यांच्या कार्यक्षेत्रात नवीन प्राथमिक सहकारी संस्था स्थापन केल्या जातील.

### रोजगाराच्या संधी...

नवीन प्राथमिक कृषी पतसंस्था, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था स्थापन केल्याने ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतील, ज्याचा ग्रामीण अर्थव्यवस्थेवर बहुपटीने परिणाम होईल. या योजनेमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांना चांगला भाव मिळू शकेल, त्यांच्या बाजारपेठेचा आकार वाढवता येईल आणि पुरवठा साखळी अखंड राहील.

Agrowon Dt. 16/02/2023

# मधुमक्षिकापालनासाठी 'हनीनेट' प्रकल्प

## कृषी विभाग शेतकऱ्यांच्या मदतीने राज्यात प्रकल्प राबविणार

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

**पुणे** : शेतकऱ्यांच्या मदतीने मधुमक्षिकापालन तसेच मध व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी तीन कोटी रुपयांच्या उपक्रमासह ग्रेपनेटच्या धर्तीवर 'हनीनेट' प्रकल्प राबविण्याच्या हालचाली कृषी विभागाने सुरू केल्या आहेत.

मध उत्पादनाबरोबरच देशांतर्गत विक्री व निर्यातीला प्रोत्साहन देणारी प्रणाली राज्यात सध्या उपलब्ध नाही. तसेच, या विषयांवर केंद्र, राज्य आणि कृषी विद्यापीठे वेगवेगळ्या स्वरूपात कामे करीत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मधुमक्षिका पालनासाठी एकत्रित माहिती मिळत नाही. कृषी विभागाकडून सध्या जुळणी केल्या जात असलेल्या या प्रकल्पात मधुमक्षिका पालनातील परिपूर्ण सुविधांपासून ते मध उत्पादनापर्यंत शेतकऱ्यांना मदत ठरणारे उपक्रम राबविले जातील. तसेच याविषयी देशी बाजारपेठांपासून ते निर्यातीपर्यंत सर्व घटकांना उपयुक्त ठरणारी माहिती दिली जाण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

**मधुमक्षिकापालन प्रकल्पाची वैशिष्ट्ये...**

- *राज्यातील मध उत्पादकांसाठी ऑनलाइन नोंदणी सुविधा.*
- *विविध जातींच्या मधमाश्यांच्या वसाहती हस्तांतरित करण्यासाठी तंत्र.*
- *मधमाश्यांना होणाऱ्या आजाराची ओळख पटविण्यासाठी उपकरणांची उपलब्धता.*
- *भाडेतत्त्वावर (कस्टम हायरिंग) मधुमक्षिका पेट्या व इतर सामग्रीची उपलब्धता.*
- *पर्यटन व कृषी क्षेत्रात मधुमक्षिकापालन तंत्राला प्रोत्साहन देण्याची तरतूद.*



"राज्यात प्रारंभी छोट्या स्वरूपात हनी मिशन सुरू करावे. त्यासाठी केंद्रीय कृषी यंत्रणांसह राज्याच्या फलोत्पादन विभागाने संयुक्तपणे शेतकऱ्यांना विविध सुविधा पुरवावी, असा प्रस्ताव आम्ही तयार करीत आहोत. राज्य कृषी विभागाच्या प्रयत्नामुळेच द्राक्षशेतीत उत्पादनापासून ते निर्यातीपर्यंत उपयुक्त ठरणारी मागोवा प्रणाली (ट्रेसेबिलिटी सिस्टिम) उपलब्ध झाली. **पान ४ वर »**

# मधुमक्षिकापालनासाठी 'हनीनेट' प्रकल्प

**» पान १ वरून**

आता त्याच धर्तीवर हनीनेट मागोवा प्रणाली तयार करण्याचाही आमचा प्रयत्न आहे," अशी माहिती राज्याचे फलोत्पादन संचालक डॉ. कैलास मोते यांनी दिली.

देशातील नैसर्गिक मध उत्पादनात ईशान्य भारतातील राज्यांसह महाराष्ट्राचा वाटा महत्त्वाचा समजला जातो. फलोत्पादन विभागाच्या म्हणण्यानुसार, गेल्या वर्षी देशातून ७४ हजार टन मधाची निर्यात झाली. त्यामुळे १२०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उलाढाल झाली. अमेरिकेसह संयुक्त अमिराती, सौदी अरेबिया, नेपाळ, मोरोक्कोमध्ये भारतीय मधाला मागणी आहे. मात्र, हनीनेट तयार झाल्यास या निर्यातीला चालना मिळणार आहे. तसेच, सामान्य मध उत्पादक शेतकऱ्यालादेखील त्याच्या मधाचा व्यापार करण्यासाठी हनीनेटची मदत मिळेल.

Agrowon Dt. 16/02/2023

# केळी निर्यातीतील संधींसाठी शेतकरी कंपन्यांनी पुढे यावे

## अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार; 'ॲग्रोवन फार्म डीएम', 'मॅग्नेट'तर्फे गुरसाळेत कार्यशाळा

ॲग्रोवन वृत्तसेवा

**गुरसाळे, जि. सोलापूर :** "जागतिक पातळीवर भारतीय केळीला मोठी मागणी आहे. केळीच्या एकूण क्षेत्रवाढ आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनात आपण पुढे आहोत. पण निर्यातीत कमी पडतो आहोत. त्यासाठी शेतकरी कंपन्या, सहकारी संस्था आणि तरुण शेतकऱ्यांनी एकत्रित येत स्टार्टअपच्या माध्यमातून या संधींचा लाभ घ्यायला हवा," अशी अपेक्षा राज्याचे सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार यांनी व्यक्त केली. "त्यासाठी आवश्यक पायभूत सुविधांसह अन्य सर्वतोपरी मदत पणन विभागाकडून देऊ", अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

**पान ४ वर »**




**गुरसाळे, जि. सोलापूर : राज्याच्या पणन विभागामार्फत आयोजित केळी-पीक उत्पादन कार्यशाळेचे उद्‌घाटन राज्याचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार यांच्या हस्ते शुक्रवारी (ता. १०) झाले. त्या वेळी (डावीकडून) 'ॲग्रोवन फार्म डीएम'चे बिझनेस हेड रविंदर कासिद, 'ॲग्रोवन'चे संपादक संचालक आदिनाथ चव्हाण, अनुपकुमार, 'मॅग्नेट'चे प्रकल्प संचालक दीपक शिंदे.**

### शेतकऱ्यांची 'ॲग्रोवन फार्म'मध्ये शिवारफेरी

*'ॲग्रोवन'च्या वतीने विकसित फार्मवर ही कार्यशाळा झाली. शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शनासह प्रत्यक्ष गुरसाळेच्या या माळरानावर घेतलेल्या केळी शेतीची शिवारफेरीही घडवण्यात आली. या वेळी जमिनीची प्रत, वाणांची निवड, केळीची लागवड, त्यातील अंतर, खत-पाणी, कीड-रोग व्यवस्थापनासह विविध तांत्रिक माहिती शेतकऱ्यांनी विचारत आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.*

### 'इक्वेडोरला जमते, ते आपल्याला का नाही?'

"केळी उत्पादनात फिलिपिन्स, थायलंड, इक्वेडोर यांसारखे छोटे देश पुढे आहेत. आपल्या केळीची गुणवत्ता, दर्जा उत्तम असूनही आपण कमी पडतो. आपल्यापेक्षा छोटासा इक्वेडोर हा देश जगभरातल्या ५२ देशांत केळी निर्यात करतो. या मार्केटचा कल जाणला पाहिजे. जे त्यांना जमते, ते आपल्याला का नाही," असा प्रश्न अनुपकुमार यांनी उपस्थित केला.

**केळीचे काटेकोर व्यवस्थापन करा, दर्जा, गुणवत्ता टिकवा ... पान ६**

Agrowon Dt. 11/02/2023

# केळी निर्यातीतील संधींसाठी शेतकरी कंपन्यांनी पुढे यावे

» पान १ वरून

राज्याच्या सहकार, पणन विभागांतर्गत आशियायी विकास बँक अर्थसाह्यित महाराष्ट्र ॲग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट), राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे आणि 'ॲग्रोवन फार्म डीएम', 'ग्रँट थॉर्टन' यांच्या संयुक्त विद्यमाने गुरसाळे येथे 'केळी-पीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी व प्रक्रिये' संबंधी कार्यशाळा झाली. मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, 'ॲग्रोवन'चे संपादक संचालक आदिनाथ चव्हाण, 'ॲग्रोवन फार्म डीएम'चे बिझनेस हेड रविंदर कासिद या वेळी उपस्थित होते.

श्री. अनुप कुमार म्हणाले, ''पीक उत्पादनाची मूल्यसाखळी विकसित करणे, हाच मॅग्नेट प्रकल्पाचा मुख्य हेतू आहे. आशियायी डेव्हलपमेंट बँकेने त्याचा अभ्यास करूनच या प्रकल्पाला मदत केली आहे. केळीसह ११ पिके या प्रकल्पात समाविष्ट केलेली आहेत. त्यात आता आंबा, काजू, पडवळ आणि लिंबू या आणखी चार पिकांचा समावेश केला आहे. केळीसारख्या पिकात मोठा वाव शेतकऱ्यांना आहे. सहयोगाने एकत्र येऊन काम करण्याचे सध्याचे युग आहे. त्यामुळेच शेतकरी गट, शेतकरी कंपन्या, सहकारी संस्था, तरुण शेतकऱ्यांनी एकत्रित येत यामध्ये उतरायला हवे. प्रिसिजन फार्मिंगनुसार अगदी काटेकोर व्यवस्थापन करायला हवे. कमी खर्चात अधिकचे उत्पादन हा विचार केला पाहिजे. ग्राहकांच्या गरजा आणि मागणी यानुसार पीक उत्पादन करायला हवे.''

''केळी उत्पादनातील आघाडीवरील फिलिपिन्स, थायलंड आणि व्हिएतनामसारख्या देशातील उत्पादनाची माहिती सांगताना त्यांनी भारताला असणाऱ्या संधींची माहिती दिली. ''केळीसारख्या पिकात हाताळणी, साठवणूक, विक्री इत्यादी बाबतीत आवश्यक माहिती आणि प्रशिक्षण आपण देणार आहोतच, पण केळीच्या निर्यातीबाबत आवश्यक प्रशिक्षणही देऊ. तसेच निर्यातदार शेतकरी कंपन्या वा संस्थांना आवश्यक प्रिकुलिंग, कोल्डस्टोरेज, पॅकहाऊस यासारख्या पायाभूत सुविधाही पुरवू, फक्त तुम्ही पुढे या,'' असे आवाहन श्री. अनुपकुमार यांनी केले.

श्री. शिंदे म्हणाले, ''राज्यातील डाळिंब, केळी, संत्रा, मोसंबी यांसह विविध ११ प्रकारचा भाजीपाला, फळपिके मॅग्नेट प्रकल्पामध्ये घेण्यात आली आहेत. सुमारे ११०० कोटी रुपये त्यावर खर्च करण्यात येत आहेत. शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी कंपन्या यांना जवळपास ६० टक्क्यांपर्यंत अनुदान देण्याऱ्या पायाभूत सुविधा पुरवण्यात येतील. काढणीपश्चात तंत्रज्ञानामध्ये शेतीमध्ये वर्षाकाठी सुमारे ४५०० कोटी रुपयांचे नुकसान होते. ते टाळण्यासाठी शेतकऱ्यांना प्रशिक्षण देणे, शेताशेजारीच प्रीकूलिंग, पॅकिंग, कोल्ड स्टोअरेजची साखळी उभी करणे, एवढेच नव्हे, तर या कंपन्यांना खेळत्या भांडवलासाठी ८ ते ९ टक्के व्याजदराने कर्जपुरवठाही केला जाईल.''

श्री. चव्हाण म्हणाले, ''गेल्या १७ वर्षात 'ॲग्रोवन'ला शेतकरी वाचकांनी भरपूर प्रेम दिले. त्यांच्या विश्वासाच्या बळावरच आम्ही वाटचाल करतो आहोत. आज ॲग्रोवन कृषी दैनिक नव्हे, तर कृषी विद्यापीठही झाले आहे, अशी शेतकऱ्यांची भावना आहे. आता तर त्यापुढे जाऊन केवळ माध्यम म्हणूनच ॲग्रोवन काम करत नाही, तर प्रत्यक्ष शेतीतही काम करतो आहे. अवघ्या वर्ष सव्वा वर्षात गुरसाळे येथे हा फार्म आम्ही विकसित केला. अगदी व्यावसायिक पद्धतीने, आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशी इथली शेती विकसित करतो आहोत. पुढच्या एक-दोन वर्षांत आपल्याला त्यात आणखी बदल दिसतील.''

'मॅग्नेट'च्या वतीने केळीवरील संपूर्ण माहिती असणाऱ्या केळी पीक माहिती पुस्तिकेचे प्रकाशन श्री. अनुपकुमार यांच्या हस्ते या वेळी करण्यात आले. राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. भास्कर पाटील यांनी आभार मानले.

## 'व्यापाऱ्यांसाठी धोरण ठरवणार'

अनेकदा छोटे-छोटे व्यापारी केळीसह अन्य शेतीमालाच्या खरेदीसाठी थेट शेतावर येऊन शेतीमालाची खरेदी करतात. त्यात दर ठरवण्यापासून ते त्याचे पैसे मिळेपर्यंत शेतकऱ्यांना अडचण येते. अनेकदा शेतकऱ्यांची फसवणूक होते, पण या व्यवहारात कोणाचाच अंकुश नसतो, असा प्रश्न काही शेतकऱ्यांनी उपस्थित केला. तसेच यामध्ये व्यापाऱ्यांची नोंदणी प्रशासनाकडे बंधनकारक करावी, अशी मागणी केली. तेव्हा अनुपकुमार यांनी ''यातील तांत्रिक बाबी पडताळून, याबाबत लवकरच सर्वंकष धोरण ठरवू,'' असे आश्वासित केले.

Agrowon Dt. 11/02/2023

# ‘केळी निर्यातीसाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे’

## ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’, ‘मॅग्नेट’तर्फे गुरसाळेत कार्यशाळा

▸ **सकाळ न्यूजनेटवर्क**

गुरसाळे (जि. सोलापूर), ता. १० : ‘‘जागतिक पातळीवर भारतीय केळीला मोठी मागणी आहे. केळीच्या एकूण क्षेत्रवाढ आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनात आपण पुढे आहोत. पण निर्यातीत कमी पडतो आहोत. त्यासाठी शेतकरी कंपन्या, सहकारी संस्था आणि तरुण शेतकऱ्यांनी एकत्रित येत स्टार्टअपच्या माध्यमातून या संधीचा लाभ घ्यायला हवा,’’ अशी अपेक्षा राज्याचे सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार यांनी व्यक्त केली. त्यासाठी आवश्यक पायभूत सुविधांसह अन्य सर्वोतपरी मदत पणन विभागाकडून देऊ, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

राज्याच्या सहकार, पणन विभागांतर्गत आशियायी विकास बँक अर्थसाहय्यीत महाराष्ट्र अ‍ॅग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट), राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे आणि ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’, ‘ग्रँट थॉर्टन’ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरसाळे येथे ‘केळी-पीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी व प्रक्रिये’ संबंधी कार्यशाळा झाली. मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, ‘अ‍ॅग्रोवन’चे संपादक- संचालक आदिनाथ चव्हाण, ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’चे बिझनेस हेड रविंदर कासिद या वेळी उपस्थित होते.

अनुप कुमार म्हणाले, ‘‘केळीसारख्या पिकात मोठा वाव शेतकऱ्यांना आहे. सहयोगाने एकत्र येऊन काम करण्याचे सध्याचे युग आहे. त्यामुळेच शेतकरी गट, शेतकरी कंपन्या, सहकारी संस्था, तरुण शेतकऱ्यांनी एकत्रित येत यामध्ये उतरायला हवे. प्रिसिजन फार्मिंगनुसार अगदी काटेकोर व्यवस्थापन करायला हवे. कमी खर्चात अधिकचे उत्पादन हा विचार केला पाहिजे. ग्राहकांच्या गरजा आणि मागणी यानुसार पीक उत्पादन करायला हवे. आपण केळीच्या निर्यातीबाबत आवश्यक प्रशिक्षण देणार आहोत. ’’




**गुरसाळे (जि. सोलापूर) : राज्याच्या पणन विभागामार्फत आयोजित केळी-पीक उत्पादन कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्या वेळी (डावीकडून) ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’चे बिझनेस हेड रविंदर कासिद, ‘अ‍ॅग्रोवन’चे संपादक संचालक आदिनाथ चव्हाण, अनुपकुमार, ‘मॅग्नेट’चे प्रकल्प संचालक दीपक शिंदे.**

### ‘केळीचे काटेकोर व्यवस्थापन करा’

▪ जगभरातील केळीच्या तुलनेत गुणवत्ता हीच सध्या भारतीय केळीची जमेची बाजू आहे. त्यामुळे केळीचा दर्जा, गुणवत्ता टिकवा, काटेकोर व्यवस्थापन करा, केळी निर्यातीत मोठी संधी आहेच, पण देशांतर्गत बाजारातही केळीला सर्वाधिक मार्केट मिळू शकते, असे मत तांत्रिक सत्रात केळी तज्ज्ञांनी व्यक्त केले. केळी तज्ज्ञ संदीप जाधव, केळी निर्यातदार अझहर पठाण, प्रगतिशील शेतकरी कपिल जाचक यांनी या वेळी मार्गदर्शन केले.

Sakal Dt. 11/02/2023

लोकमत

# कांदा विक्री व्यवस्थापनात पणन योजनेचा लाभ घ्यावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** कांदा विक्री व्यवस्थापनात पणन मंडळाच्या योजना आहेत त्यांचा लाभ आणि कांदा-लसूण संशोधनाचे देश पातळीचे केंद्र राजगुरू नगरला आहे. त्याचा फायदा शेतकऱ्यांनी घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणेचे सहायक सरव्यवस्थापक मंगेश कदम यांनी नारायणगाव येथे केले.

ग्रामोन्नती मंडळ कृषी विज्ञान केंद्र नारायणगाव येथे ग्लोबल कृषी जिल्हा महोत्सव २०२३ पीक प्रात्यक्षिके, कृषी प्रदर्शन व पीक परिसंवाद कार्यक्रमा अंतर्गत शास्त्रोक्त पद्धतीने कांदा उत्पादन व कांदा विक्रीचे व्यवस्थापन या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी कृषिरत्न अनिल तात्या मेहेर, प्रगतशील शेतकरी विक्रम अवचट, विघ्नहर कारखान्याचे व्हा. चेअरमन अशोक घोलप, ग्रामोन्नती मंडळाचे संचालक देवीदास भुजबळ, शास्त्रज्ञ राहुल घाडगे, योगेश यादव आदी उपस्थित होते. संतवाडी येथील संशोधक शेतकरी सावळेराम पाडेकर यांनी मार्गदर्शन करताना म्हणाले की, नवीन सुधारित जातींचा अवलंब करा. गादी वाफ्यावर रोपांची निर्मिती करा. उत्पादन खर्च कमी करा,संतुलित खतांचा वापर करावा,असे आवाहन त्यांनी केले. ओतूर येथील प्रगतशील शेतकरी विक्रम अवचट हे अध्यक्ष म्हणून होते. त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की,जमिनीची खोलवर नांगरट करणे महत्त्वाचे आहे. एक पीक पद्धत राबविण्यापेक्षा बहुविध पीक पद्धतींचा अवलंब करा. प्रास्ताविक कृषी विज्ञान केंद्राचे भरत टेमकर यांनी केले.



# फूल संशोधनाचा स्वयंचलित इंडो-डच प्रकल्प कार्यान्वित

## शेतकऱ्यांना अत्याधुनिक प्रशिक्षण; १५ कोटींचा निधी, २५८ शेतकऱ्यांनी घेतला लाभ

**गणेश कोरे : ॲग्रोवन वृत्तसेवा**

पुणे : निर्यातक्षम फूल उत्पादनाचे क्लस्टर होत असलेल्या मावळ तालुक्यात पुष्पोत्पादनाच्या एकात्मिक विकास अभियानांतर्गत फूल संशोधनाचा आणखी अद्वितीय (सेंटर फॉर एक्सलन्स) प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. संपूर्णतः संगणकीकृत आणि स्वयंचलित असलेल्या प्रकल्पाचा फूल उत्पादकांना फायदा होत आहे. प्रकल्प कार्यान्वित झाल्यापासून २५८ शेतकऱ्यांनी प्रशिक्षण घेतले आहे. भविष्यातील निर्यातदार फूल उत्पादक या प्रशिक्षणातून घडत आहेत. या प्रकल्पासाठी इंडो-डच प्रकल्पांतर्गत केंद्र सरकारकडून १२ कोटी, तर पणन मंडळाने तीन कोटींचा निधी दिला आहे.



**तळगाव दाभाडे, जि. पुणे : इंडो-डच प्रकल्पांतर्गत संपूर्णतः संगणकीकृत स्वयंचलित पॉलिहाउसची उभारणी करण्यात आली आहे.**

अत्याधुनिक पद्धतीने निर्यातक्षम फुलशेतीत येणाऱ्या तरुण शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान मिळावे, यासाठी इंडो-डच सहकार्य प्रकल्पाच्या राष्ट्रीय कृषी विकास अभियाना अंतर्गत हा प्रकल्प तळेगाव दाभाडे येथील पणन मंडळाच्या राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेमध्ये साकारला आहे. राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्थेचे संचालक डॉ. भास्कर पाटील म्हणाले, ''डच तंत्रज्ञानाने आणि भारतीय तंत्रज्ञानाने फुलांची पॉलिहाउसमधील आणि प्रक्षेत्रावर केलेल्या लागवडीचा तुलनात्मक अभ्यास आणि संशोधन या प्रकल्पाद्वारे होत आहे. या संशोधनामध्ये शेतकऱ्यांचा देखील सहभाग घेतला जात आहे. त्यांना प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षणामध्ये डच तंत्रज्ञानानुसार कमीत कमी पाणी आणि निविष्ठांचा वापर करून फुलांचे उत्पादन घेतले जाईल. यासाठी एक एकरावर डच तंत्रज्ञानाने संपूर्णतः संगणकीकृत स्वयंचलित पॉलिहाउस उभारण्यात आले आहे. शेजारी भारतीय तंत्रज्ञानाचा वापर करून पॉलिहाउस उभारण्यात येत आहे. तर तेवढ्याच क्षेत्रावर उघड्या जागेवर गुलाब, जरबेरा आणि कार्नेशन, निशिगंधाची लागवड केली आहे. या तीनही वाणांवर विविध वातावरणात आणि तंत्रज्ञानाचा कोणता परिणाम होतो आणि कोणते उत्पादन दर्जेदार होते. याचा अभ्यास केला जात आहे.''

> **आंतरराष्ट्रीय बाजारात भारतीय फुलांचा दबदबा निर्माण व्हावा. त्या दृष्टीने मागणीनुसार निर्यातक्षम फुले उत्पादन संशोधन आणि प्रशिक्षणासाठी हे केंद्र राज्यातील शेतकऱ्यांना वरदान ठरेल. कृषी विभागासोबत समन्वय साधत या ठिकाणी तीन दिवसांचा निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबवीत आहोत. त्यासाठी अत्याधुनिक शेतीमध्ये रस असणारे तरुण शेतकरी, उद्योजक आणि उच्चशिक्षित तरुण आकर्षित होत आहेत.**
>
> **- डॉ. भास्कर पाटील, संचालक,** राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे, जि. पुणे

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये

- फुलांच्या अर्थकारणानुसार उत्पादकता वाढविणे
- फुलांच्या विविध वाणांची लागवड आणि संशोधन
- स्वयंचलित तंत्रज्ञानाच्या वापरातून कमीत कमी पाणी आणि निविष्ठांचा वापर
- शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण फुलांचे काढणी पश्चात नुकसान टाळणे
- कीड, रोगांच्या व्यवस्थापनासाठी तंत्रज्ञानाचा वापर
- आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी संलग्न उत्पादन

Agrowon Dt. 11/02/2023

# ‘केळी निर्यातीसाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे’

## ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’, ‘मॅग्नेट’तर्फे गुरसाळेत कार्यशाळा

▶ सकाळ न्यूजनेटवर्क

गुरसाळे (जि. सोलापूर), ता. १० : ‘‘जागतिक पातळीवर भारतीय केळीला मोठी मागणी आहे. केळीच्या एकूण क्षेत्रवाढ आणि गुणवत्तापूर्ण उत्पादनात आपण पुढे आहोत. पण निर्यातीत कमी पडतो आहोत. त्यासाठी शेतकरी कंपन्या, सहकारी संस्था आणि तरुण शेतकऱ्यांनी एकत्रित येत स्टार्टअपच्या माध्यमातून या संधीचा लाभ घ्यायला हवा,’’ अशी अपेक्षा राज्याचे सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार यांनी व्यक्त केली. त्यासाठी आवश्यक पायभूत सुविधांसह अन्य सर्वोतपरी मदत पणन विभागाकडून देऊ, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

राज्याच्या सहकार, पणन विभागांतर्गत आशियायी विकास बँक अर्थसाहय्यीत महाराष्ट्र अ‍ॅग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट), राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे आणि ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’, ‘ग्रँट थॉर्टन’ यांच्या संयुक्त विद्यमाने गुरसाळे येथे ‘केळी-पीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी व प्रक्रिये’ संबंधी कार्यशाळा झाली. मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे, ‘अ‍ॅग्रोवन’चे संपादक- संचालक आदिनाथ चव्हाण, ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’चे बिझनेस हेड रविंदर कासिद या वेळी उपस्थित होते.

अनुप कुमार म्हणाले, ‘‘केळीसारख्या पिकात मोठा वाव शेतकऱ्यांना आहे. सहयोगाने एकत्र येऊन काम करण्याचे सध्याचे युग आहे. त्यामुळेच शेतकरी गट, शेतकरी कंपन्या, सहकारी संस्था, तरुण शेतकऱ्यांनी एकत्रित येत यामध्ये उतरायला हवे. प्रिसिजन फार्मिंगनुसार अगदी काटेकोर व्यवस्थापन करायला हवे. कमी खर्चात अधिकचे उत्पादन हा विचार केला पाहिजे. ग्राहकांच्या गरजा आणि मागणी यानुसार पीक उत्पादन करायला हवे. आपण केळीच्या निर्यातीबाबत आवश्यक प्रशिक्षण देणार आहोत.’’




**गुरसाळे (जि. सोलापूर) : राज्याच्या पणन विभागामार्फत आयोजित केळी-पीक उत्पादन कार्यशाळेचे उद्घाटन राज्याचे अप्पर मुख्य सचिव अनुपकुमार यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. त्या वेळी (डावीकडून) ‘अ‍ॅग्रोवन फार्म डीएम’चे बिझनेस हेड रविंदर कासिद, ‘अ‍ॅग्रोवन’चे संपादक संचालक आदिनाथ चव्हाण, अनुपकुमार, ‘मॅग्नेट’चे प्रकल्प संचालक दीपक शिंदे.**

### ‘केळीचे काटेकोर व्यवस्थापन करा’

■ जगभरातील केळीच्या तुलनेत गुणवत्ता हीच सध्या भारतीय केळीची जमेची बाजू आहे. त्यामुळे केळीचा दर्जा, गुणवत्ता टिकवा, काटेकोर व्यवस्थापन करा, केळी निर्यातीत मोठी संधी आहेच, पण देशांतर्गत बाजारातही केळीला सर्वाधिक मार्केट मिळू शकते, असे मत तांत्रिक सत्रात केळी तज्ज्ञांनी व्यक्त केले. केळी तज्ज्ञ संदीप जाधव, केळी निर्यातदार अझहर पठाण, प्रगतिशील शेतकरी कपिल जाचक यांनी या वेळी मार्गदर्शन केले.


Sakal Dt. 11/02/2023

पुणे, गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३

सकाळ अॅग्रोवन

# केळी उत्पादन, हाताळणी, प्रक्रियेवर उद्या कार्यशाळा

## ‘मॅग्नेट’ आणि अॅग्रोवन फार्म डीएम यांचा पुढाकार

**अॅग्रोवन वृत्तसेवा**

ADB FarmDM AGROWON

सोलापूर : राज्याच्या सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग विभागांतर्गत आशियायी विकास बँक अर्थसाह्यित महाराष्ट्र अॅग्री बिझनेस नेटवर्क प्रकल्प (मॅग्नेट), राष्ट्रीय सुगीपश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे आणि अॅग्रोवन फार्म डीएम यांच्या संयुक्त विद्यमाने उद्या (ता. १०) गुरसाळे (ता. माळशिरस) येथे ‘केळी-पीक उत्पादन, सुगीपश्चात हाताळणी व प्रक्रिये’संबंधी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

गुरसाळे येथील ‘अॅग्रोवन फार्म्स’वर सकाळी १० वाजता सहकार आणि पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक दीपक शिंदे आणि ‘अॅग्रोवन’चे संपादक- संचालक आदिनाथ चव्हाण यांच्या उपस्थितीत या कार्यशाळेचे उद्‌घाटन होईल. त्यानंतर टिश्युकल्चर केळी तज्ज्ञ संदीप जाधव, केळी निर्यातदार अझहर पठाण आणि प्रगतिशील शेतकरी कपिल जाचक हे तांत्रिक मार्गदर्शन करतील. केळी उत्पादन, पीक हाताळणी, साठवणूक, विक्री इत्यादीसाठी मॅग्नेट प्रकल्पांतर्गत विविध योजना कार्यान्वित आहेत. याशिवाय गुणवत्ता, गॅप प्रमाणीकरणातील अडचणींच्या निवारण होण्याच्या दृष्टीने ही कार्यशाळा महत्त्वाची आहे. याकरिताचे प्रवेश मर्यादित असून, येथे नोंदणी आवश्यक आहे. नोंदणीकरिता संपर्क : ज्ञानेश थोरात - ९६२३५३३०६९, संदेश कुलकर्णी- ९९२२८१९९२०. कार्यशाळेसाठी प्रवेश विनामूल्य आहे.

### केळी फार्म भेट, पुस्तक प्रकाशन

अॅग्रोवन फार्ममधल्या केळी पिकाच्या सुगीपश्चात तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेण्याची संधी शेतकऱ्यांना या वेळी मिळणार आहे. तसेच ‘मॅग्नेट’च्या वतीने केळीवरील संपूर्ण माहिती असणाऱ्या केळी पीक माहिती पुस्तिकेचे प्रकाशन उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते होणार आहे.

Pudhari Dt. 05/02/2023

# जीआय मानांकनप्राप्त उत्पादनांना येणार सुगीचे दिवस

- केंद्रीय अर्थसंकल्पात युनिटी मॉल स्थापण्याची घोषणा
- एकाच छताखाली सर्व वस्तू; योग्य दरही मिळणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशातील भौगोलिक मानांकनप्राप्त (जीआय) शेतीमालासाठी युनिटी मॉल स्थापन करण्याच्या केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अर्थसंकल्पातील घोषणेमुळे शेतकऱ्यांच्या अशा वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळून सुगीचे दिवस येण्याची शक्यता आहे. शिवाय, अशा जीआय मानांकनप्राप्त वस्तूंची विक्री एकाच छताखाली होण्यामुळेही त्यास योग्य बाजारभावही मिळणार आहे.

जीआय मानांकन विषयातील तज्ज्ञ गणेश हिंगमिरे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, केंद्र व राज्य सरकारच्या संयुक्त प्रयत्नांतून जीआय मानांकनप्राप्त शेतीमाल एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यामुळे शेतकऱ्यांबरोबरच ग्राहकांनाही खरेदीची संधी उपलब्ध होणार आहे. जीआय मानांकनाचे पदार्थ बनविणारे शेतकरी, विणकर किंवा या पदार्थांसाठी कार्यरत समुदायांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पातील याबाबत केलेली युनिटी मॉल स्थापण्याची घोषणा महत्त्वपूर्ण आहे.

जीआय म्हणजे भौगोलिक मानांकन असून, याचा अर्थ एखाद्या विशिष्ट भागांतून येणाऱ्या विशिष्ट पदार्थाला बौद्धिक संपदा असे स्थान मिळते. उदाहरण विचारात घेतल्यास दार्जिलिंगचा चहा किंवा महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी या पदार्थांना खास वैशिष्ट्य राहते, त्यामुळे त्यांना खास बाजारपेठ आणि दरही चांगला मिळतो; पण त्यासाठी जीआय नोंदणी आवश्यक असते आणि त्या संदर्भातला कायदा भारतात २० वर्षांपूर्वीच आला होता.

## एक जिल्हा, एक उत्पादन

केंद्राने युनिटी मॉल या आजच्या 'एक जिल्हा, एक पदार्थ' योजनेतही याचा समावेश केला आहे. बहुतेक 'एक जिल्हा, एक पदार्थ' हे जीआय नोंदणीकृत असल्याने हा अप्रत्यक्ष जीआय पदार्थांसाठीच युनिटी मॉल प्रस्तावित केला आहे. या मॉलचा फायदा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात होऊ शकतो. त्यासाठी योजनेची अंमलबजावणी आणि तिचे नियोजन व्यवस्थित होणे आवश्यक असल्याचेही हिंगमिरे यांनी सांगितले.

# कृषी उत्पादनांच्या निर्यातीत २० टक्क्यांवर वाढ : तोमर

**नवी दिल्ली (एएनआय) :** ''गेल्या काही वर्षांत कृषी आणि संबंधित उत्पादनांच्या निर्यातीत लक्षणीय वाढ झाली आहे,'' अशी



माहिती केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी संसदेत दिली. या उत्पादनांची २०२१-२२ या वर्षात ३ लाख ७४ हजार ६११ कोटी रुपयांची विक्रमी निर्यात झाली आहे. त्यात २०.७९ टक्क्यांनी वाढ झाली आहे, असे कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने शुक्रवारी (ता. ३) जाहीर केलेल्या निवेदनात नमूद आहे. निवेदनानुसार, २०१९-२० मध्ये कृषी आणि संबंधित उत्पादनांची निर्यात २ लाख ५२ हजार ४०० कोटी रुपयांची होती. हीच निर्यात २०२०-२१ मध्ये ३ लाख १० हजार १३० कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. त्यात २२.८७ टक्क्यांची वाढ झाली. तर २०२१-२२ या वर्षात ३ लाख ७४ हजार ६११ कोटी रुपयांची विक्रमी निर्यात झाली आहे. त्यात २०.७९ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

तोमर यांनी माहिती दिल्यानुसार, देशाच्या पश्चिम विभागात गुजरात आणि महाराष्ट्राने कृषी आणि संबंधित उत्पादनांच्या निर्यातीत आघाडी घेतली आहे.

### कच्च्या कापसाची निर्यात वाढली

२०२१-२२ मध्ये कच्च्या कापसाच्या निर्यातीत ७ हजार ३८.६६ कोटी रुपयांची वाढ झाली, तर इतर तृणधान्यांचे मूल्य २९११.०४ रुपयांनी वाढले. तर दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीत २ हजार ३५२.९३ कोटी रुपयांची वाढ झाली आहे, तर कॉफीचे मूल्य २ हजार २७३.९७ कोटी रुपयांनी वाढले. याशिवाय एरंडेल तेलाच्या निर्यातीत १ हजार ९५२.३६ कोटी रुपयांची वाढ झाली. तर विविध प्रक्रिया केलेल्या वस्तूंचे मूल्य २ हजार ३११.८६ कोटी रुपयांनी वाढले.

Agrowon Dt. 05/02/2023

# बाजार समित्यांसाठी आराखडा तयार करा

## पणन विभागाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सूचना

**ॲग्रोवन वृत्तसेवा**



मुंबई : "बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधांवर भर द्या. त्यासाठी पणन विभागाने सर्वंकष आराखडा तयार करावा, कृषी आणि पणन विभागाने एकत्र काम केले तरच शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल. त्यामुळे या दोन्ही विभागांची एकत्र बैठक तत्काळ घ्या," असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृहावर कृषी राज्य पणन मंडळ, ग्राहक महासंघ, पणन महासंघ, वखार महामंडळ आणि कापूस उत्पादक पणन महासंघाच्या कामकाजाचा आढावा शिंदे यांनी घेतला.

शिंदे म्हणाले, "पणन महासंघाच्या माध्यमातून शेतीमालाला उत्तम भाव देण्यासोबतच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी सेंद्रिय खतांच्या निर्मितीला चालना द्या. तसेच शेतीपूरक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्याला प्राधान्य द्यावे."

या बैठकीत पणन महासंघाने कृषी पणन कायदेविषयक कामकाज, बाजार समित्यांमधील फळे, भाजीपाला, कांदा, बटाटा, अन्नधान्याची आवक, बाजार समित्यांचा नफा-तोटा, कृषी प्रक्रिया सहकारी संस्था प्रकल्पांची सद्यःस्थिती, खरेदी विक्री संघांची आर्थिक स्थिती, पणन मंडळाच्या निर्यात केंद्रातून केलेला भाजीपाला निर्यात, मिळालेले उत्पन्न, पणन मंडळाच्या विविध योजना आदींचा आढावा घेण्यात आला. खतनिर्मिती, कापूस खरेदीची सद्यःस्थिती, वखार महामंडळाचे विविध उपक्रम, महाराष्ट्र स्टेट को- ऑप कन्झ्युमर्स फेडरेशन, मॅग्नेट आदींबाबत सविस्तर सादरीकरण करण्यात आले.

"काळाची गरज लक्षात घेता बाजार समित्यांचा पुनर्विकास करून तिथे येणारे शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्यासाठी सोयी-सुविधा तयार करा. पाणी, स्वच्छता, अंतर्गत रस्ते आदी सुविधांची निर्मिती करण्यासाठी आराखडा तयार करा," अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिल्या. समृद्धी महामार्गालगत उभारण्यात आलेल्या ॲग्रो लॉजिस्टिक पार्कचा विस्तार करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, सहसचिव डॉ. सुग्रीव धपाटे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

Agrowon Dt. 04/02/2023

Punyanagari Dt. 03/02/2023

# राज्यातील बाजार समित्यांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध होणार

## मुख्यमंत्री शिंदे यांनी दिले आराखडा तयार करण्याचे निर्देश

**मुंबई** : राज्यातील बाजार समित्यांमध्ये येणाऱ्या शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत, या दृष्टीने सर्व बाजार समित्यांमध्ये पायाभूत सुविधांची कामे करण्यासाठी सविस्तर आराखडा तयार करा आणि त्या माध्यमातून दर्जेदार सोयी-सुविधांची निर्मिती करा, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दिले.

सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत पणन विभागाचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी सहकार व पणन विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार यादव यांच्यासह राज्य वखार महामंडळ, पणन महासंघ, कृषी राज्य पणन मंडळ, ग्राहक महासंघ, कापूस उत्पादक पणन महासंघाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. काळाची गरज लक्षात घेता बाजार समित्यांचा पुनर्विकास करून तिथे येणारे शेतकरी, कष्टकरी, कामगार यांच्यासाठी सोयी-सुविधा तयार करण्यात याव्यात. पाणी, स्वच्छता, अंतर्गत रस्ते आदी सुविधांची निर्मिती करण्यासाठी आराखडा तयार करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी बैठकीत दिल्या.

पणन महासंघाच्या माध्यमातून शेतमालाला उत्तम भाव देण्यासोबतच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी सेंद्रिय खतांच्या निर्मितीला चालना द्या, तसेच शेतीपूरक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्याला प्राधान्य द्यावे, असे निर्देश देतानाच समृद्धी महामार्गालगत उभारण्यात आलेल्या ॲग्रो लॉजिस्टिक पार्कचा विस्तार करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

Agrowon Dt. 02/02/2023

# शेतकऱ्यांना तारण योजनेचा आधार

## अमरावती बाजार समितीकडून अडीच कोटींचे कर्जवाटप

**अमरावती :** शेतमालांना अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या तारण योजनेचा आधार घेतला आहे. विशेषतः सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी या योजनेचा अधिक लाभ घेतला असून अमरावती बाजार समितीने २ कोटी ४३ लाखांचे कर्ज शेतकऱ्यांना दिले.

अनेक शेतकऱ्यांकडे शेतीमाल साठवून ठेवण्यासाठी घरी पर्याप्त जागा उपलब्ध नसते. अशावेळी बाजार समितीचे धान्य गोदाम त्यांच्यासाठी मोठा आधार असतो. शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल सहा महिने या गोदामांत ठेवता येतो. त्यासाठी शेतकऱ्यांकडून भाडे मात्र घेतले जात नाही. सात-बारा, आधार कार्ड व बँक पासबुकची सत्यप्रत जमा केल्यावर शेतकऱ्यांना जागा दिली जाते. या धान्याच्या मोबदल्यात तारण म्हणून हवी असलेली रक्कमही शेतकऱ्यांना ६ टक्के व्याजदराने दिली जाते.

> **बाजार समितीची तारण योजना शेतकऱ्यांसाठी लाभदायक असून शेतीमालाचे भाव वाढल्यावर त्याला विक्रीची मुभा आहे. अल्प व्याजदरात ही सोय उपलब्ध करून दिली असून दरवर्षी शेतकरी या योजनेचा लाभ घेत आहेत. अधिक संख्येने शेतकऱ्यांनी या योजनेत सहभागी व्हावे.**
>
> **- पवन देशमुख**, प्रभारी निरीक्षक, बाजार समिती अमरावती.

अमरावती बाजार समितीने गेल्या १ एप्रिल ते ३० डिसेंबर या कालावधीत २१७ शेतकऱ्यांना २ कोटी ४३ लाख ३३ हजार ५०७ रुपयांचे तारण वाटप केले आहे. यामध्ये सोयाबीन, हरभरा व तूर उत्पादक शेतकऱ्यांचा समावेश आहे. सध्या ८६३४ क्विंटल शेतीमाल या गोदामात आहे.

सध्या सोयाबीनला खुल्या बाजारात ५३०० रुपये भाव आहे. सहा हजारांवर अद्याप भाव चढले नसल्याने शेतकऱ्यांनी गरजेपुरती आवक सुरू ठेवली आहे. गतवर्षीप्रमाणे यंदा भाव मिळतील अशी त्यांना अपेक्षा असल्याने बाजारातील आवक अल्प आहे. या बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी ८३२९ क्विंटल सोयाबीन, १६४ क्विंटल तूर व १४१ क्विंटल हरभरा तारण ठेवले आहे. शेतकऱ्यांना त्यांचा शेतीमाल वाटेल तेव्हा विक्री करण्याची सोय आहे. त्यासाठी त्याला तारण घेतलेली रक्कम व्याजासह बाजार समितीला परत करावी लागणार आहे.